# Success Stories



श्री. उमेश गाळवणकर

मलेशिया मध्ये गेंटिंग हायलँन्डस हे हिल रिसार्ट पर्वतावर बांधण्याचे स्वप्न एका गवंड्याने बघितले. आज तेथे जगातील सर्वाधिक वेगवान व साउथ इस्ट आशियातील सर्वात मोठी गंडोला उद्‌वाहक आहे. १३०० रूम्स असलेले पर्वतावरील Five Star Resort आहे. जगभरातील टुरिस्टची ये-जा गंडोलानेच केली जाते. हे केवळ अशक्यप्राय नव्हे तर स्वप्नात देखील कोणी असा विचार करणार नाही. आज अशाच प्रकारची एक कुडाळ मधील Success Stories खास आपल्यासाठी....! खिशात दमडी नसताना शिक्षणसंस्था उभारणीचे स्वप्न पहाणारा तरुण कुडाळदेशकर!

कुडाळ मधील ५ एकर जमीन MIDC साठी गेली... २५ गुंठे जमीन कोकण रेल्वेला गेली.... वडील श्री. सुंदर राजाराम गाळवणकर (वायमान गार्डन बंद पडली)... आता फक्त उरली ३ गुंठे जमीन त्यात कुटुंबासह वास्तव्य, ३ मुलगे व २ मुली असा संसार. घरगुती वायरमेनचे काम करून चरितार्थ चालविणे. उमेश, महेश, सिद्धेश व दोन मुली शिक्षण घेता घेताच दररोज ह्या परिस्तीथीशी सामना करीत जीवन जगत होत्या. त्यात उमेश ने मात्र संघर्षमय जिवन हाच आपला सोबती म्हणत इतिहास घडविला. तो केवळ अचंबित नव्हे तर थक्क करणारा आहे.

कोकण रेल्वे कोकणात आली की, कोकणातून गेली... जसा नांगर फिरवावा तशी! त्यांचा खरा फायदा कोणाला झाला, असे अनेक प्रश्न अजूनही वादादीत आहेत. परंतु, आपल्या भूमिपुत्रांना नोकऱ्या व मुख्य प्रवाहात समाविष्ट केले जावे अशा अनेक पदवीधर तरुणांनी मागण्या केल्या. त्यातीलच एक उमेश गाळवणकर. ...!

कोकण रेल्वे मध्ये १९९६ ते १९९९ पर्यंत हमाल, नंतर बोल्डर गँगमन म्हणून काम करून २००३ साली कारकून पदासाठी प्रयत्न केला. परंतु, त्याला संस्थेने परीक्षा प्रवेश नाकारला. त्याचवेळी स्वतःची शिक्षण संस्था उभारून कोकणातील भूमिपुत्रांना शिक्षण, न्यायहक्क व समानता, मिळविण्यासाठी २८ वर्षाच्या उमेशने इतीहास रचला. बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग ची स्थापना केली. चला पाहूया...... शिक्षणसंस्था संस्थापक उमेशजींचा जिवन प्रवास!

५ जून १९७६ मध्ये पिंगुळी गाव येथे गाळवणकर कुटुंबात उमेश सुंदर गाळवणकर यांचा जन्म झाला. शालेय जिवनात इयत्ता सहावी मध्ये म्हणजे शैक्षणिक वर्ष सन १९८७-८८ मध्ये नापास होऊन पुन्हा त्याच इयत्तेत शिकले. नापास झाल्याच्या रागातून दाखला काढून इयत्ता सातवी मध्ये (म्हणजेच जून १९८९) मुंबई घाटकोपर भटवाडी शाळा क्रमांक दोन मध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर सातवी ते आठवी पर्यंत मुबईत शिक्षण पूर्ण केले. त्यावेळी नाटकाची आवड असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेत दूरदर्शनवर "राजू तू खर सांग" या मालिकेत राजूच्या मित्राची भूमिका केली. पण पुढील शिक्षण देणे नातेवाईकांना शक्य नसल्यामुळे मग पुन्हा इयत्ता नववी मध्ये कुडाळ हायस्कूल मध्ये आले. इयत्ता नववी शिकत असताना वार्षिक स्नेहसमेंलनात श्री. खोत सरांनी गोकुळ गेल कोर्टात ही एकांकिका बसविली. त्यात उमेशची खोटे वकिलाची भूमिका खूप गाजली. इयत्ता १० वी मध्ये श्री. टोपले सर यांनी इंग्रजीत पास होण्याची जबाबदारी घेतली आणि भिडे सरांनी गणितात पास होण्याची जबाबदारी घेऊन एकदा गंगेत घोड न्हाल आणि उमेश गाळवणकर मार्च १९९३ मध्ये झालेल्या १० वी बोर्डाच्या परीक्षेत ४२.५% गुण मिळवत उत्तीर्ण झाले आणि कुडाळ मधील मारुती मंदिर, कुडाळेश्वर मंदिर, केळबाई ब्राह्मण देव, गवळदेव, भैरवमंदिर, लक्ष्मि मंदिर, रवळनाथ मंदिर, माउली देवी, वालावल नारायण मंदिर, कलेश्वर, इ. सर्व देवांना केलेले नवस फेडून पुढील प्रवास सुरु केला.

दहावीची परीक्षा पास झाल्यानंतर पोर फुकट जाता नये म्हणून त्यांच्या वडिलांनी त्यांना भुसारी दुकानात कामाला ठेवले. काम करून खानोली येथील बॅ. नाथ पै कृषी विद्यालयातून पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला.पदविके परीक्षे दरम्यान उमेशच्या सख्ख्या मोठ्या बहिणीचे ब्लड कॅन्सर च्या आजाराने निधन झाले. त्यामुळे एप्रिल १९९६ मध्ये परीक्षा पुन्हा दिली व त्यात उत्तीर्ण झाला.

कृषी पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ग्रामसेवक पदाची नोकरी मिळते असे वाचनात होते परंतु उमेशचा हा कोर्स पूर्ण झाल्या नंतर ग्रामसेवकाची पदे भरण्याचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे ग्रामसेवकाच्या नोकरीच्या मागे न लागता कोकण रेल्वेत जमीन संपादन झाल्यामुळे नोकरीसाठी प्रयत्न करायचे ठरविले. तिथेही काकांच्या नावे जमीन असल्याने



प्रचंड अडथळे आले, त्या नोकरीच्या प्रयत्नात प्रा. मधु दंडवते यांनी एकूण १० पत्रे दिली तरी नोकरी मिळाली नाही शेवटी १९९७ मध्ये कुली पदासाठी जाहिरात आली आणि उमेशने कोकण रेल्वेत कुली पदाची नोकरी स्वीकारली पण तिथेही दैव आड आले कोकण रेल्वेने दिलेला कुलीचा मंजूर केलेला बक्कल नंबर दिला नाही. उमेशने कुडाळच्या फलाटावर आपले काम चालूच ठेवले शेवटी कोकण रेल्वेची १९९८ मध्ये बोल्डर गॅंगमन पदे निर्माण झालीं त्यात रोजंदारिवर काम करणाऱ्या लोकांना तसेच जमीन गेलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात आले आणि मे १९९८ मध्ये उमेश गाळवणकर कोकण रेल्वेच्या सेवेत रुजू झाले. त्यानंतर त्यांनी १९९९ ते २००२ या कालवधीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.ए. ची पदवी पूर्ण करतानाच के.आर.सी. एम्पॉइज युनियन या विभागाच्या चेअरमन पदावर निवड झाली आणि कामगार संघटना चालविताना कामगार कायद्याचे ज्ञान घ्यावे म्हणून रत्नागिरी येथील कीर विधी महाविद्यालयात प्रवेश मागितला पण तिथे प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्या रागाने तत्कालीन पालक मंत्री अजितराव घोरपडे यांनी प्रेरणा घेऊन व पुढाकाराने शिक्षणसंस्था स्थापन करून व सिंधुदुर्ग जिल्ह्यातच शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरविले. त्यानुसार १८ जानेवारी २००३ मध्ये बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग या नावाने शिक्षण संस्था स्थापन केली. बॅ. नाथ पै यांचा ज्येष्ठ मुलगा श्री. आनंद पंढरीनाथ पै यांनी त्यास मान्यता दिली. परंतु, खरी अडचण भांडवल उभारणी मध्ये होती. जवळपास खर्च रु. ९ लाख आणि खिश्यात फक्त रु. १०,००० त्यावेळी कोकणरेल्वेच्या सोसायटी मधून त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्येकी रु. २५,००० कर्ज घेऊन, ८ लाखाचे भांडवल उभे केले. खाजगी कर्जाची परत फेड झाली. परंतु, कोकणरेल्वेचा खलाशी/हमाल/गॅंगमन यांचे पैसे संस्था उभारणीमध्ये लागले आहेत, हे उमेश गाळवणकर कृतज्ञतापूर्वक सांगतात. एस.एन.डी.टी. मुंबई या महिला विद्यापिठाशी संलग्न महिला बी.एड. महाविद्यालय सुरु करण्याचे ठरले व २००३ मध्ये बी.एड. महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव दाखल केला. २००५ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिले महिला महाविद्यालय सुरु झाले.

सन २००६ मध्ये जिल्ह्यातील पहिलेच शालेय व्यवस्थापन पदविका सुरु करून जिल्ह्यातील शिक्षक सेवेत असलेल्या शिक्षकांना पदोन्नतीसाठी आवश्यक असणारी पदविका प्रदान करण्यात संस्थेने यश मिळवले. सन २००७ मध्ये डी. एड. विद्यालय सुरु करून १२ वी यश मिळवलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्राथमिक शिक्षक होण्याची संधी दिली. सन २००९ मध्ये जिल्ह्यातील पहिले नर्सिंग महाविद्यालय सुरु केले. हे महाविद्यालय महाराष्ट्र (MUHS) संलग्नित असून त्यास भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई तसेच महाराष्ट्र शासन यांची मान्यता आहे. याच महाविद्यालयात १० वी झालेल्या परिचारिका घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दीड वर्षाचा (RNM) हा अभ्यासक्रम सुरु केला या अभ्यासक्रमास भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबईची मान्यता आहे. बॅं. नाथ पै शिक्षण संस्थेने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिल्यांदा इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्व विद्यालय बी.एड. अभ्यासक्रम सुरु करून जिल्ह्यातील शिक्षक सेवेत असलेल्या शेकडो शिक्षकांना बी.एड पदवी प्रदान करण्यात यश मिळविले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिली (CBSE) बोर्डाचा अभ्यासक्रम असणारी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यात महाराष्ट्र शासनाची परवानगी घेऊन सन २००९ मध्ये इयत्ता पहिली सुरु करून आज इयत्ता सातवीचा वर्ग सुरु आहे. २०१३ मध्ये कोकणातील मुंबई विद्यापीठाचे महिलांचे पहिले, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरु करून महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

विधानसभेचे माजी अध्यक्ष मा. दिलीप वळसे-पाटील, खासदार मा. सुप्रिया सुळे, माजी खासदार स्व. एकनाथ ठाकूर, तसेच मुबई विद्यापिठाचे माजी कुलगुरू डॉ.भालचंद्र मुणगेकर, खासदार विनायक राऊत, पालकमंत्री मा. दीपक केसरकर, माजी पालक मंत्री मा. अजितराव घोरपडे, अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ अणुऊर्जातज्ञ डॉ.अनिल काकोडकर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री.राज ठाकरे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, प्रख्यात




मानसोपचार तज्ञ प्रदीप पाटकर ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेते डॉ.गिरीष ओक, जेष्ठ सिनेनाट्य अभिनेते डॉ. अमोल कोल्हे, गीतकार श्री. गुरु ठाकूर, डॉ. रवींद्र शिसवे, श्री. अविनाश घोरपडे, श्री. प्रसन्ना असे आय.ए.एस. व आय.पी.एस. अशा अनेक मान्यवरांनी संस्थेस भेटी देऊन संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केलेले आहे. दिवाणी न्यायाधीश नंदी मठ, मा. वर्षाराणी पत्रावळे, आर. पी. यादव यांनी स्त्री-भ्रूण हत्या, महिलांचे हक्क आणि अधिकार या विषयांवर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य सेविकांना पुन्हा कामावर घ्या. डी.एड. विद्यालयातील कला, क्रीडा, संगीत, शिक्षक ही पदे अर्धवेळ ऐवजी पूर्णवेळ करावीत.बी.एड. अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी CET पदवी परीक्षेस बसलेल्या विद्यार्थीनीना देता यावी. तसेच अनेक महाविद्यालयातील जागा रिक्त राहिल्यास CET परीक्षेस शिथिलता देऊन अशा अनेक शैक्षणिक समस्या मंत्रालय पातळीवर पाठपुरावा करून सोडवण्यात संस्थेने यश मिळविले आहे. बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेच्या अध्याक्षांसमवेत प्रत्येक कार्यक्रमात किंवा नवीन काही उपक्रम सुरु करायचा असेल तरीही संस्थेतील प्रत्येक शिक्षक, कर्मचारीवृंद, हिरहिरीने सहभागी होतात आणि त्यामुळे येथे एक प्रसन्न व संस्कारमय वातावरण निर्माण झाले आहे. तेच संस्थेच्या यशाचे गमक आहे.

या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अभ्यासक्रमाबरोबरच सामाजिक बांधिलकीचे ज्ञान देऊन पुढील स्पर्धेसाठी तयार केले जाते. या संस्थेतील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता जी शासकीय फी आवश्यक आहे, ती घेतली जाते. परंतु, ती सुद्धा भरणे शक्य नाही, म्हणून आजपर्यंत एकही विद्यार्थी किवा विद्यार्थिनी निराश होऊन परत गेलेले नाही. हे विशेष!

समाजात ज्या ज्या वेळी अन्यायकारक घटना घडतात किंवा विकृतीचा उद्रेक होतो. तेव्हा उदा. डॉ. पानसरे, डॉ. नरेंद्र दाभोलकर, गौरी लंकेश यांची हत्या होते त्याक्षणी विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच आजूबाजूच्या परिसरातील नागरिक, राजकीय, सामाजिक व्यक्ती यांना एकत्र करून निषेध फेरी काढणारी एकमेव संस्था म्हणजे बॅ. नाथ पै शिक्षण संस्था.

आज आपण राजकारणात गेला नाहीत असे विचारल्यावर ते म्हणाले..... राजकारण्याची मला अमुल्य मदत माझ्या जिवन संघर्षा पासूनच झाली. सिंधुदुर्ग ते दिल्ली व दिल्ली ते सिंधुदुर्ग हे अंतर मला फारच छोटे वाटते. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी ते रामदास आठवले, नारायण राणे ते मेजर सुधीर सावंत, जितेंद्र आव्हाड ते हुसेन दलवाई सर्वांची मदत झालेली आहे. राजकारणाचा उपयोग मी जीवनात समाजकारणासाठी करण्याचे ठरविले आहे. माझी ''कोकण-कन्या'' संपूर्ण भारतात व जगात कशी पोहचेल हेच आजतागायत पहात आलोय.

शैक्षणिक क्षेत्रात सिंधुदुर्ग जिल्ह्यात भरीव कामगिरीबद्दल माजी हवाईदल प्रमुख ए.एम. नाईक यांच्या हस्ते अ.भा.गौ. ब्रा. समाज, पनवेल तर्फे पुरस्कार मिळाला. तसेच सिंधुदुर्ग जिल्हा बौद्ध सेवा संघाचा पुरस्कार माजी कुलगुरू डॉ.भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते मिळालेला आहे. आज त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अमृता उमेश गाळवणकर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून संस्थेचे कामकाज पाहतात व मुलगा कु. रजत गाळवणकर बाबां बरोबर सगळीकडे फिरून अवलोकन करतो व इयत्ता २री मध्ये शिक्षण घेत आहे.

उमेशजींची Success Story प्रेरणा देणारी, आशादायी तर आहेच. परंतु, लढण्याची जिद्द, आत्मविश्वास, क्रियाशीलता, त्याग, कल्पनेतून विश्वनिर्माण करणारी कल्पकता, सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेली देखील आहे. त्यामुळे ती वेगळी आहे. समाजातील प्रत्येक कुटुंबाने बॅ. नाथ पै शिक्षण संस्था कुडाळला आवश्य भेट द्यावी. उमेशजींच्या चेंबर मधील दुर्मीळ व जिवंत पेंटिंग्स सुद्धा पहावीत. जी नक्कीच तुम्हाला वेगळ्या काळात घेऊन जातील.

उमेशजी गाळवणकर व कुटुंबियांना गौड ब्राह्मण सभे तर्फे भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

शुभम भवतू !

**मनीष दाभोलकर**

manish_dab@hotmail.com

९८२१२५८०४७